ePaper

| वर्ष - 8 | अंक - 358 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

www.mahaenews.com | बुधवार, दि. 6 ऑगस्ट 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## गझलनवाज भीमराव पांचाळे यांचा लता मंगेशकर पुरस्काराने गौरव



### आतील पानांत


- सिराजच्या यशाची त्रिसूत्री!
- सिराज अखेरच्या षटकांमध्ये संतापला
- सदन तुम्ही चालवता की अमित शहा?
- तेज यादव यांचा तेजस्वीना धक्का?


## निवडणूक आयोगाने दिली 'गुड न्यूज': स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डिसेंबर जानेवारीमध्ये!

# दिवाळीनंतर निवडणुकांचे रणांगण!


### निवडणुका ईव्हीएम वरच पण व्ही व्ही पॅट मशीन वापरली जाणार नाही, विरोधकांकडून जोरदार टीका!

। मुंबई । प्रतिनिधी ।

महाईन्यूज

**महाराष्ट्रातील सर्वांचेच लक्ष लागलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची तारीख जाहीर करून निवडणूक आयोगाने सर्वांना सुखद धक्का तसेच 'गुड न्यूज' दिलेली आहे. येत्या दिवाळीनंतर म्हणजेच डिसेंबर किंवा जानेवारीत या निवडणुकांचे रणांगण पेटणार असून सर्वच राजकीय पक्षांनी जोरदार तयारीला सुरुवात केली आहे. मुख्य मुद्दा म्हणजे, ही निवडणूक ईव्हीएम वर होणार असून यावेळी 'व्ही व्ही पॅट' मशीनचा वापर होणार नाही, असेही निवडणूक आयोगाने जाहीर केले आहे.**




### राजकीय वातावरण पेटण्यास सुरुवात

स्थानिक स्वराज्य संस्थांची बहुचर्चित निवडणूक दिवाळीनंतर होणार असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर सर्वच राजकीय पक्षांमध्ये वातावरण पेटण्यास सुरुवात झाली आहे. 'महायुती' मधील भारतीय जनता पार्टी, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांनी पूर्वीच चाचणी सुरू केली आहे. तर 'महाविकास आघाडी' मधील संभ्रमावस्था काही संपलेली नाही. या आघाडीतील उद्धव ठाकरे गटाने राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेबरोबर आघाडी करण्याचे ठरविले असल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस कोणती भूमिका घेतात, हे अधांतरी आहे.

### आयुक्त दिनेश वाघमारे यांची घोषणा...

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका दिवाळीनंतर म्हणजेच डिसेंबर-जानेवारीमध्ये होणार आहेत, असे राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी जाहीर केले आहे. सर्वच राजकीय पक्षांनी या घोषणेचे स्वागत केले असून निवडणुकीच्या फडात उतरण्याच्या दृष्टीने रणशिंग फुंकले आहे.

### निवडणुका टप्प्याटप्प्याने होणार

निवडणुका टप्प्याटप्प्याने होणार आहेत, अशी माहितीही राज्य निवडणूक आयोगाने दिली आहे. या निवडणुका घेण्याची आयोगाची तयारी पूर्ण झाली असून लवकरच त्या दृष्टीने अधिसूचना जारी केली जाईल आणि नंतर आचारसंहिता लागेल, असेही वाघमारे यांनी स्पष्ट केले आहे.

### नाशिकमध्ये विभागीय बैठक..

महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगामार्फत स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नाशिकमध्ये विभागीय बैठक घेण्यात आली. यात नंदुरबार, जळगाव, धुळे, नाशिक, अहिल्यानगर या जिल्ह्यांचा आढावा घेण्यात आला. यात या निवडणुका दिवाळीनंतर होणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे.

### ओबीसी आरक्षणासह निवडणूक

दरम्यान, सोमवारी नव्या प्रभाग रचनेनुसार ओबीसी आरक्षणासह निवडणुकांना मंजुरी मिळाली होती. नव्या प्रभाग रचनेला आव्हान देणाऱ्या याचिका सुप्रीम कोर्टाकडून फेटाळण्यात आल्या होत्या. त्यामुळे आता आगानी निवडणुका नव्या प्रभाग रचनेनुसार ओबीसी आरक्षणासह घेण्यास मंजुरी मिळाली आहे. त्याबाबत पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांनाही आयुक्तांनी समर्पक उत्तरे दिली.

### महत्त्वाच्या महानगरपालिका..

राज्यातील महत्त्वाच्या माहापालिका लक्षात घेतल्या तर तेथे निवडणुकांची रणधुमाळी याच पूर्वी सुरू झालेली आहे. नाशिक महापालिका, पिंपरी चिंचवड महापालिका, पुणे महापालिका, मुंबई महापालिका यांच्या प्रभाग रचनेमध्ये काही बदल करण्यात आले होते आणि नव्या प्रभाग रचनेला आव्हान देणाऱ्या काही याचिका कोर्टात सादर करण्यात आल्या होत्या.

### मुंबईमध्ये जुन्याच प्रभागानुसार

मुंबईमध्ये जुन्याच प्रभागानुसार निवडणुका होणार आहेत. त्यानुसार मुंबई महानगरपालिकेमध्ये २२७ एक सदस्यीय प्रभाग रचना करण्यात येणार आहे. तर पुणे, नागपूर, ठाणे, नाशिक, नवी मुंबई, पिंपरी-चिंचवड, छत्रपती संभाजीनगर, यासह इतर सर्व महानगरपालिकांमध्ये चार सदस्यांचे प्रभाग असणार आहेत.

### प्रभाग रचनेतील बदल रद्द

मुंबईमध्ये आधीही २२७ प्रभाग होते. महाविकास आघाडीचे सरकारआल्यानंतर त्यामध्ये वाढ होऊन २३६ प्रभाग करण्यात आले होते. पुन्हा, राज्यामध्ये 'महायुती' सरकार सत्तेत आल्यानंतर २२७ प्रभाग करण्यात आले. त्यास सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते.

### या महानगरपालिकांसाठी चार सदस्यीय प्रभाग

अ, ब आणि क वर्ग महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक चार सदस्यीय प्रभाग पध्दतीनुसार प्रभाग रचना करण्याबाबतचे आदेश जारी झाले आहेत. त्यांची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे : 'अ' वर्ग महानगरपालिका : पुणे, नागपूर, 'ब' वर्ग महानगरपालिका : ठाणे, नाशिक, पिंपरी-चिंचवड, 'क' वर्ग महानगरपालिका : नवी मुंबई, वसई-विरार, छत्रपती संभाजी नगर, कल्याण-डोंबिवली.

**प्रदूषणात वाढ** प्रदूषणात वाढ; पर्यावरण सद्य:स्थिती अहवालातील माहिती

# पिंपरीच्या हवेची गुणवत्ता खालावली!

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**वाहनांची वाढती संख्या, औद्योगिकीकरण, बदललेल्या राहणीमानामुळे पिंपरी-चिंचवड शहरातील हवेची गुणवत्ता खालावली आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मानकापेक्षा धुलीकणांचे प्रमाण वाढले आहे. तसेच ध्वनी प्रदूषणातही वाढ झाल्याचे महापालिकेच्या पर्यावरण अहवालातून समोर आले आहे.**

## कचऱ्यापासून वीज, बायोगॅस निर्मिती



## पवना नदी सर्वाधिक प्रदूषित

> गतवर्षी एक लाख ७३ हजार ५७६ वृक्षांची लागवड केल्याचा दावा महापालिकेने केला आहे.पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या सुमारे २५ लाख आहे. वाहनांची संख्या १९ लाख आठ हजार ५५० आहे. गतवर्षीच्या तुलनेत नोंदणीकृत वाहनांच्या संख्येत ३६ टक्क्यांनी वाढ झाली आहे. शहरात नोंदणी होणाऱ्या एकूण वाहनांपैकी ३.५ टक्के ई-वाहनांचे प्रमाण आहे.

पिंपरी-चिंचवड शहराच्या पर्यावरण क्षेत्रातील स्थितीचा मागोवा घेणारा २०२४-२५ चा पर्यावरण सद्य:स्थिती अहवाल मंगळवारी प्रसिद्ध करण्यात आला. या अहवालात क्षेत्र आणि लोकसंख्या, हवामानातील बदल, पर्जन्यमान, पाणीपुरवठा, नदी-नाले-तलावांची सद्यस्थिती, जलनि:स्सारण योजना व मैलाशुद्धीकरण प्रकल्प, हवेतील व ध्वनी प्रदूषणाचे स्तर, मृदा गुणवत्ता, घनकचरा व्यवस्थापन, ऊर्जा वापर, रस्ते आणि वाहतूक व्यवस्था, स्मार्ट सिटी प्रकल्प, शिक्षण, वैद्यकीय सेवा, उद्याने, उद्योगधंदे, आपत्ती व्यवस्थापन, शहर नूतनीकरण योजना आदी घटकांचा समावेश करण्यात आला आहे. गतवर्षी एक लाख ७३ हजार ५७६ वृक्षांची लागवड केल्याचा दावा महापालिकेने केला आहे.पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या सुमारे २५ लाख आहे. वाहनांची संख्या १९ लाख आठ हजार ५५० आहे. गतवर्षीच्या तुलनेत नोंदणीकृत वाहनांच्या संख्येत ३६ टक्क्यांनी वाढ झाली आहे. शहरात नोंदणी होणाऱ्या एकूण वाहनांपैकी ३.५ टक्के ई-वाहनांचे प्रमाण आहे. ५० हजार ९०२ ई-वाहनांची नोंद झाली आहे.मोशीतील कचरा डेपोत आतापर्यंत तीन लाख ५१ हजार ५४२ मेट्रीक टन घरगुती कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात आली. त्यापासून १३ कोटी ७९ लाख ४० हजार ८५९ युनिट्सची वीज निर्मिती झाली. बांधकाम राडारोडा व्यवस्थापन प्रकल्पामधील ३९ हजार ८२७ टन कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात आली. हॉटेल वेस्ट टू बायोगॅस या प्रकल्पामध्ये तीन हजार ५९३ टन ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात आली. यामधून एक लाख १२ हजार २४९ किलोग्रॅम बायोगॅसची निर्मिती करण्यात आली.शहरातील तळवडे, भोसरी एमआयडीसी या औद्योगिक पट्ट्यासह पिंपरी कॅम्प, पिंपळे सौदागर परिसरातील मॉल, बाजारपेठ, भाजी मंडई, मेट्रो परिसरात ध्वनी प्रदूषणात वाढ झाली आहे. ध्वनी प्रदूषण पातळी विहित मर्यादेपेक्षा अधिक आहे. शहरातून पवना नदी २४.४ किलो मीटर, इंद्रायणी २०.६ तर मुळा नदी १२.४ किलोमीटर अंतर वाहते. शहराच्या मध्यभागातून वाहणारी पवना नदी सर्वाधिक प्रदूषित आहे. नाल्याचे पाणी प्रक्रिया न करता नदीत सोडले जाते. त्यामुळे नदीचे प्रदूषण वाढले आहे. त्याखोलाखाल शहराच्या उत्तरेकडून वाहणारी इंद्रायणी नदी प्रदूषित आहे. औद्योगिक क्षेत्रातील रसायनयुक्त पाण्यामुळे प्रदूषण होत असल्याचे अहवालात म्हटले आहे. त्यानंतर शहराच्या दक्षिणेकडून वाहणारी मुळा नदी प्रदूषित आहे.पिंपरी-चिंचवड शहराच्या पर्यावरण क्षेत्रातील स्थितीचा मागोवा घेणारा २०२४-२५ चा पर्यावरण सद्य:स्थिती अहवाल मंगळवारी प्रसिद्ध करण्यात आला. या अहवालात क्षेत्र आणि लोकसंख्या, हवामानातील बदल, पर्जन्यमान, पाणीपुरवठा, नदी-नाले-तलावांची सद्यस्थिती, घनकचरा व्यवस्थापन, ऊर्जा उद्योगधंदे, आपत्ती व्यवस्थापन, शहर नूतनीकरण योजना आदी घटकांचा समावेश करण्यात आला आहे.

# पुण्यात उच्च न्यायालयाचे खंडपीठ करा

## खासदार सुप्रिया सुळे यांचे मुख्यमंत्री फडणवीस यांना पत्र

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यातील नीरा नरसिंगपूर येथून मुंबई उच्च न्यायालयापर्यंतचे अंतर सुमारे ३५० किलोमीटर आहे. या अंतरावरून नागरिक, वकील आणि साक्षीदारांना जाण्यासाठी वेळ आणि त्रास होत असल्याने कोल्हापूरप्रमाणे पुण्यातही उच्च न्यायालयाचे खंडपीठ सुरू करण्याची मागणी खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे. याबाबतचे पत्र त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले आहे.**



## मुख्यमंत्री फडणवीस यांना पत्र

> असा दावाही खासदार सुळे यांनी केला आहे.पुण्यात उच्च न्यायालयाचे खंडपीठ व्हावे, ही गेल्या अनेक वर्षांपासूनची मागणी आहे. नुकतीच कोल्हापूर खंडपीठाला मान्यता मिळल्यामुळे या मागणीचा जोर वाढला आहे. पुणे बार असोसिएशनकडूनही याबाबतची मागणी करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर खासदार सुप्रिया सुळे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना पत्र देत ही मागणी केली आहे

पुण्यात उच्च न्यायालयाचे खंडपीठ व्हावे, ही गेल्या अनेक वर्षांपासूनची मागणी आहे. नुकतीच कोल्हापूर खंडपीठाला मान्यता मिळल्यामुळे या मागणीचा जोर वाढला आहे. पुणे बार असोसिएशनकडूनही याबाबतची मागणी करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर खासदार सुप्रिया सुळे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना पत्र देत ही मागणी केली आहे. जिल्ह्यातील शेवटच्या टोकावर असलेल्या इंदापूर तालुक्यातील नीरा नरसिंगपूर येथून मुंबई उच्च न्यायालयापर्यंतचे अंतर सुमारे ३५० किलोमीटर आहे. हे अंतर पार करताना सामान्य नागरिक, वकील, विधिज्ञ आणि साक्षीदार यांना वेळखाऊ, खर्चिक आणि मानसिक त्रासाला सामोरे जावे लागते. ही परिस्थिती 'जस्टिस डिलेड इज जस्टिस डिनाईड' या तत्वाला बाधा आणणारी आहे, असे खासदार सुळे यांनी पत्रात नमूद केले आहे.जिल्ह्याची लोकसंख्या एक कोटीहून जास्त आहे. पुणे हे विभागाचे प्रशासकीय मुख्यालय असल्याने सर्व शासकीय आस्थापना येथे आहेतकामगार न्यायालय यांसारखी विशेष न्यायालयेही कार्यरत आहेत. जिल्ह्यात सुमारे २५ हजार सक्रिय वकील व्यवसाय करत आहेत.

रस्ता रुंदीकरण विरोध

## रस्ता रुंदीकरण विरोधात ठराव देखील पारित

# माण परिसरातील ग्रामस्थ आक्रमक!

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विरोधात घोषणा

। पिंपरी-चिंचवड ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज



**पिंपरी चिंचवड: आयटी पार्क हिंजवडी, माण आणि मारुंजी परिसरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी अजित पवार यांनी भल्या पहाटे दौरे करत, आयटी पार्क परिसरातील रस्ते रुंदीकरण करण्याचे कठोर निर्णय घेतले. मात्र अजित पवारांच्या निर्णया विरोधात आता माण ग्रामपंचायतच्या ग्रामस्थांनी ठराव पारित केला आहे.**

आयटी पार्क हिजवडी पाठोपाठ आता आयटी पार्क परिसरातील माण ग्रामपंचायत ने देखील उप मुख्यमंत्री अजित पवार यांच्या रस्ता रुंदीकरणाच्या धोरणाला कडाडून विरोध केला जात आहे. आयटी पार्क परिसरातील रस्ते रुंदीकरणाला विरोध नाही. मात्र आमच्या गावातील गावठाणाचे रस्ते हे फक्त २४ मीटर रुंद करण्यात यावे व गावठाणा बाहेरील रस्ते ३६ मीटर रुंदीचे करण्यात यावे; अशी मागणी माण ग्रामपंचायतीच्या ग्रामस्थांनी केली आहे.

### ग्रामस्थांवर केला जातोय अन्याय

एकीकडे हिंजवडी फेज वन ते फेज श्री असा ३६ मीटर रुंदीचा उड्डाणपूल बांधण्याचे नियोजन राज्य सरकारने केले आहे. तर दुसरीकडे त्याच ३६ मीटर रुंदीच्या उड्डाण पुलाखालील रस्ता देखील ३६ मीटर रुंद करून राज्य सरकार आयटी पार्क परिसरातील ग्रामस्थांवर अन्याय करत आहे; असा दावा माण ग्रामपंचायतच्या ग्रामस्थांनी केला आहे. तसेच केवळ अभियंत्यांचेच म्हणणे विचारात घेतले जात असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

### तर न्यायालयात दाद मागणार

रस्ता रुंदीकरण करत असताना माण ग्रामपंचायत गावठाणातील मंदिर, शाळा, दुकान आणि नागरिकांचे घर बाधित होत आहेत. रस्ता रुंदीकरणात बाधित होणाऱ्या ग्रामस्थांचा विचार प्रशासन जर करत नसेल तर शेवटी अजित पवारांच्या धोरणा विरोधात आम्हाला न्यायालयात दाद मागावी लागेल अशा इशारा माण गावच्या ग्रामस्थांनी दिला आहे.

---


# सोसायटीधारकांनाही ५०% मालमत्ता कर सवलत द्या!

## पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशनची मागणी; महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना निवेदन

। पिंपरी चिंचवड ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिकेने नुकताच रेड झोनमध्ये येणाऱ्या मिळकतधारकांना मालमत्ता करात ५०% सवलत देण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे शहरातील हजारो प्रामाणिक कर भरणाऱ्या सोसायटीधारकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.**

चिखली-मोशी-पिंपरी-चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांनी महापालिका आयुक्त तथा प्रशासक श्री. शेखर सिंह यांना निवेदन देत ठाम मागणी केली आहे की,“सवलत द्यायचीच असेल, तर शहरातील हजारो सोसायटीधारकांनाही ती दिली गेली पाहिजे. अन्यथा हे निर्णय प्रामाणिक करदात्यांवर अन्याय करणारे ठरतील.”



इंद्रायणी परिसर सोशल सोसायटीचे
चिखली-मोशी-पिंपरी चिंचवड हौसिंग सोसायट[illegible]
(नोंदणी क्रमांक : महा./१२३६/२०२१/दिनांक : ०१/१०/२०२१)
* अध्यक्ष *
श्री. संजीवन सांगळे
मो. ८९७५२८२३७७
पत्ता : गट नं.१११, जी.के. पॅलेसिओ सोसायटी, डी-६०४, बोऱ्हाडेवाडी, मोशी (पिंपरी-चिंच[illegible]
Email ID : cmpcsocietyfederation@gmail.com

जावक क्र.: 264/2025
दिनां[illegible]

प्रति,
माननीय श्री. शेखर सिंह साहेब,
आयुक्त तथा प्रशासक,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे – १८

विषय: रेड झोन बाधित मिळकतधारकांप्रमाणे सोसायटीधारकांना देखील ५०% मालमत्ता करात सवलत देण्याबाबत विनंती

माननीय महोदय,

सविनय निवेदन करण्यात येते की, आपल्या महानगरपालिकेने पिंपरी चिंचवड शहरातील रेड झोन बाधित मिळकतधारकांना मालमत्ता करात ५०% सवलत देण्याचा निर्णय घेतलेला आहे. सदर निर्णय सामाजिक दृष्टिकोनातून योग्य असला तरी, तो अन्य नागरी करदात्यांच्या दृष्टीने अन्यायकारक वाटतो.
पिंपरी चिंचवड शहरातील हजारो सोसायट्यांचे रहिवासी – जे नियमित कर भरणारे प्रामाणिक नागरिक आहेत – त्यांना आजही महानगरपालिकेकडून मूलभूत नागरी सुविधा पुरविल्या जात नाहीत. यामध्ये पुढील गंभीर अडचणींचा समावेश आहे:

1. पाणीपुरवठ्याची गंभीर समस्या: लाखो रुपयांचा खर्च करून सोसायट्यांना पाण्याचे टँकर मागवावे लागत आहेत.
2. रस्त्यांची अत्यंत दुरवस्था: अनेक भागांत रस्तेच उपलब्ध नाहीत किंवा असलेले रस्ते अतिशय खराब अवस्थेत आहेत.
3. कचरा व्यवस्थापनातील हलगर्जीपणा: वेळेवर कचरा उचलला जात नाही, स्वच्छतेचा अभाव आहे.
4. वाहतुकीची असुविधा आणि नियोजनाचा अभाव: रस्ते अरुंद, वाहतुकीचे नियोजन अपुरे.
5. इतर मूलभूत सुविधा यांचीही पूर्णपणे वानवा

अशा परिस्थितीत आम्ही नियमित मालमत्ता कर भरत असताना, आमच्या कररूपात जमा होणाऱ्या पैशांचा योग्य विनियोग न होता इतर भागातील सवलतींसाठी वापर होतो, ही बाब अत्यंत खेदजनक आहे. आमच्या सोसायट्यांना ना सुविधा, ना सेवा, आणि वेळेवर कर न भरल्यास पाण्याचे कनेक्शन तोडले जाते — हे दुहेरी अन्यायाचे स्पष्ट उदाहरण आहे. म्हणून आमची ठाम मागणी आहे की, रेड झोन बाधित मिळकतधारकांना जसे ५०% सवलत देण्यात आली, त्याच न्याय तत्वावर सोसायटीधारकांनाही मालमत्ता करात ५०% सवलत त्वरित द्यावी.

जर वरील मागणीची गांभीर्याने दखल घेऊन लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घेण्यात आला नाही, तर आम्ही हजारो सोसायटीधारक एकत्र येऊन मोठ्या प्रमाणात लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यास बाध्य होऊ – याची कृपया नोंद घ्यावी.

अध्यक्ष
चिखली-मोशी- पिंपरी चिंचवड
हाउसींग सोसायटी फेडरेशन मर्या.पुणे




फेडरेशनच्या म्हणण्यानुसार, सोसायट्यांना आजही मूलभूत नागरी सुविधा मिळत नाहीत, नियमित पाणीपुरवठ्याऐवजी टँकरवर अवलंबून रहावे लागते. रस्त्यांची अवस्था दयनीय आहे; काही ठिकाणी रस्तेच नाहीत. कचरा व्यवस्थापनात हलगर्जीपणा, स्वच्छतेचा अभाव आहे वाहतूक नियोजनाचा पूर्णतः अभाव आहे. “आम्ही नियमित कर भरतो, तरीही आम्हाला मूलभूत सुविधा नाकारल्या जातात. त्याचवेळी काही ठिकाणी केवळ स्थानिक राजकीय दबावाखाली सवलती दिल्या जातात – हे अन्यायकारक आहे.”

सवलत हवीच, अन्यथा लोकशाही मार्गाने लढा... फेडरेशनने इशारा दिला आहे की जर सोसायटीधारकांनाही ५०% सवलत त्वरित जाहीर केली नाही, तर शहरातील सर्व सोसायट्यांचे प्रतिनिधी एकत्र येऊन लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडतील. “राजकीय फायद्यासाठी निवडक घटकांना सवलत देणं म्हणजे प्रामाणिक करदात्यांची थट्टा आहे. हा अन्याय आम्ही खपवून घेणार नाही,” असा सजग इशारा फेडरेशनने दिला आहे.

> “महापालिकेकडून आम्हा सोसायटीधारकांकडून नियमित कर घेतला जातो, पण त्याच्या बदल्यात पाणी, रस्ते, कचरा व्यवस्थापन यांसारख्या मूलभूत सुविधा मात्र दिल्या जात नाहीत. आणि अशा परिस्थितीत जर केवळ रेड झोनमध्ये येणाऱ्या मिळकतधारकांना ५०% कर सवलत दिली जात असेल, तर ती प्रामाणिक करदात्यांच्या विश्वासाला तडा देणारी गोष्ट आहे. हा अन्याय थांबवण्यासाठी सोसायटीधारकांनाही तत्काळ ५०% सवलत द्यावी, अन्यथा आम्ही लोकशाही मार्गाने आंदोलन करणार आहोत.
>
> **—संजीवन सांगळे,** अध्यक्ष, चिखली-मोशी-पिंपरी-चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशन.

## नाम हा परमात्म्याकडे जाण्याचा राजमार्ग



**'देहच मी' हा भ्रम.**

आपण कोण, आपले कर्तव्य काय, हे कळणे जसे व्यवहारात जरूर असते, तद्वतच परमार्थातसुद्धा मी कोण हे कळले पाहिजे. ज्याला मी 'माझे' म्हणतो तो 'मी' नव्हे खास. 'माझा' देह म्हटल्यावर 'मी' त्याहून निराळाच नव्हे का ? देहाला ताप आला तर 'मला' ताप आला, देह वाळला तर 'मी' वाळलो, असे म्हणतो हीच चूक, हाच भ्रम. वास्तविक, देहाहून वेगळा असूनही देहच मी अशी भावना केली. म्हणून मी सुखदुःख अनुभवू लागलो. दुःख नको, सुख हवे, असे मला वाटते, याचा अर्थ माझे मूळचे स्वरूप हे नित्यसुख-रूप असले पाहिजे. नदीच्या पात्रातले पाणी आणि तिथूनच भांड्यात आणलेले पाणी, दोन्ही एकच; पण भांड्यातल्या पाण्याला चव किंवा स्वाद निराळाच येत असेल, तर भांड्यात घाण आहे असे आपल्याला समजते. तसे, सुख-रूप असणाऱ्या आत्म्याचाच अंश असलेला जीव दुःख-रूप झाला याचे कारण देहसंगती. एका गृहस्थाची बायको बाळंत झाली, तेव्हा त्याच्या मित्राने डॉक्टरची मदत आणि अशा इतर अनेक बाबतीत धावपळ केली, पण त्याने सोयर मुळीच पाळले नाही; त्या मित्राप्रमाणे आपण देहाबाबत वागले पाहिजे. एखादे झाड काढायचे असेल, आणि ते पुनः वाढू नये अशी इच्छा असली, तर त्याची पालवी वरवर खुडून काम होत नाही, त्याच्या मुळाला पाणी घालणे बंद केले पाहिजे. तद्वतच, संसाररूपी वृक्षाला आम्ही अभिमानाचे पाणी वारंवार घातल्यामुळे तो इतका फोफावला आहे, तो अभिमान नष्ट केला पाहिजे. 'मी कर्म केले' हा भ्रम टाकून दिला पाहिजे. खरा कर्ता ईश्वर असताना जीव विनाकारणच 'मी कर्ता' असे मानतो. कर्तृत्व आपल्याकडे घेतल्यामुळे जीव सुखदुःख भोगतो. तेव्हा 'मी कर्ता नसून राम कर्ता' ही भावना वाढविणे, हीच खरी उपासना होय. आपल्या आयुष्यात ज्या ज्या गोष्टी घडतात त्या सर्व भगवंताच्या इच्छेनेच घडतात अशी पूर्ण खात्री झाली की मग सुखदुःख उरत नाही. ज्याची अशी खरी निष्ठा आहे त्याचे तेज काही निराळेच असते. अशा माणसाला अचल समाधान लाभते; किंबहुना, हेच साधुत्वाचे मुख्य लक्षण जाणावे. हे आपल्या अंगी यावे म्हणून साधनाची सर्व खटपट चालते. खरोखर, तुम्हा सर्वांना आता पुनः एकच सांगतो की, सदैव नामात राहण्याचा प्रयत्न करा, आणि नीतीला धरून राहा; त्यानेच तुम्हांला भगवंत भेटेल. परमार्थात नीतीला, शुद्ध आचरणाला, फार महत्त्व आहे. जो शुद्ध मनाने परमेश्वराचे चिंतन, नामस्मरण करतो, त्याला साहाय्य करायला परमेश्वर सदैव तत्पर असतो. आपण त्या परमेश्वराला शरण जाऊन त्याच्या नामाचे प्रेम मागू या. दीनदयाळ भक्तवत्सल परमेश्वर कृपेचा वर्षाव करील याची खात्री बाळगा.

**बोधवचन:- नामस्मरण 'समजून' करावे; समजून म्हणजे 'राम कर्ता' या भावनेत राहून.**



**'स्टेट'मेंट**

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# नहीं चलेगी, नहीं चलेगी, 'दादागिरी'..नहीं चलेगी !

**केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना टिळक पुरस्कार प्रदान करण्याचा कार्यक्रम नुकताच पार पडला. सर्वच नेत्यांची टोलेबाजी त्यावेळी चांगलीच गाजली. विशेषतः, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दादा या मुद्द्यावर मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांची चांगलीच खेचली. अर्थात् नंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या स्टाईलमध्ये अजितदादांना सुनावले तो भाग वेगळा !**



### अजितदादा आणि चंद्रकांतदादा..

पुण्याशी संबंधित असलेल्या पालकमंत्री अजितदादा आणि मंत्री चंद्रकांतदादा यांच्यात नेमके नाते काय, हे समजू शकत नाही. पण, अजितदादा हे नेहमी चंद्रकांतदादांची खेचताना दिसतात. बिचारे, चंद्रकांतदादा त्यांना उत्तरे वगैरे देण्याच्या भानगडीत पडत नाहीत आणि आपले काम चोख पार पाडताना दिसतात. एका कार्यक्रमाला उशिरा येण्यावरून पूर्वी अजितदादा उगीचच चंद्रकांतदादांवर सटकले होते. तसेच पालकमंत्रीपदावर असलेल्या चंद्रकांतदादांना दूर व्हावे लागले आणि ते पद अजितदादांना बहाल करणे भाग पडले, हे उदाहरण अगदी ताजे आहे !

### कोथरूडकरांचा लाडका नेता..

मूळचे कोल्हापूरचे असलेले चंद्रकांतदादा बदलत्या राजकीय परिस्थितीत कोथरूड येथे स्थायिक झाले आणि तेथून मोठ्या फरकाने निवडणूक जिंकू लागले, अर्थातच त्यांनी कोथरूडकरांची मने सुद्धा जिंकली ! कोथरूडकरांनी चंद्रकांतदादा यांना एक लाखापेक्षाही अधिक मतांनी निवडून दिले . राज्याच्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या महत्त्वपूर्ण खात्यासह पुण्याचे पालकमंत्रीपद देखील चंद्रकांत दादांनी काही वर्ष भूषविले. 'उपरा उमेदवार' म्हणून हिणवलेले गेलेले चंद्रकांतदादा आता खऱ्या अर्थाने पुणेकर झाले. महात्मा सोसायटी मधील 'देवाशिष' बंगल्यावर गर्दी देखील होऊ लागली ! पुण्याबरोबरच कोथरूडचे प्रश्न सोडविणाऱ्या बैठका येथे झडतात. परंतु, या बैठकांमधून जे निष्कर्ष निघतात, तीच चंद्रकांतदादांची ताकद !

### संघाचा शिस्तबद्ध, सभ्य कार्यकर्ता..

चंद्रकांतदादा एक सभ्य , सालस , सरळमार्गी आणि संघीय भाषेत शिस्तबद्ध आणि 'रचनेतील कार्यकर्ता' ! त्यामुळे त्यांच्या पठडीत आणि चाकोरीत बसेल तितके, त्यांना झेपेल आणि दिसेल तसे काम करण्याचा मात्र त्यांचा सपाटा असतो. सार्वत्रिक विधायक भावना ही सकारात्मक राजकारणाची आहे, हे लपून राहत नाही आणि ते अजितदादांनाही ठाऊक आहे.

### चंद्रकांतदादांची गोची ?

कोथरूडमध्ये असे काही राजकीय फासे पडले आहेत, की त्यामुळे चंद्रकांतदादांची गोची करण्याचा प्रयत्न सुरू आहे की काय हे समजत नाही. स्वतः चंद्रकांतदादा, राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी आणि केंद्रीयमंत्री मुरलीधर मोहोळ हे तिघेही कोथरूड मतदारसंघातील..तिघांचेही कार्यक्षेत्र कोथरूड ! देवेंद्र फडणवीस यांचे जवळचे म्हणून गेल्या काही वर्षात मुरलीधर मोहोळ यांना ताकद मिळत आहे. मेधा कुलकर्णी यांना देखील संघाचे मोठे पाठबळ.. सत्तेचे विकेंद्रीकरण झाले. पुढील महानगरपालिका निवडणुकीसाठी मोहोळ यांचा चेहरा पुढे करण्याचे प्रयत्न भाजपाच्या माध्यमातून सुरू आहेत. या सर्व गोष्टींमुळे चंद्रकांतदादा थोडे साईट ट्रॅक झाले की काय? असा प्रश्न पुढे येतो.

### अजितदादा नाण्याची दुसरी बाजू..

अजितदादा हे नेमके 'नाण्याची दुसरी बाजू' आहेत. मुळात त्यांना कोंडाळे पसंत नाही. त्यामुळे आपण कार्यकर्त्यांच्या नाही, तर जनतेच्या जीवावर पुढे चाललेला एक 'लोकनेता' ही प्रतिमा करून देण्याच्या आग्रहात ते असतात .त्यांना येथील भाजपा कार्यकर्त्यांनी अद्यापही स्वीकारलेले नाही आणि त्यांच्या विरोधातील मिमिक्री आणि सिंचन घोटाळ्याचे कलंक विरोधकांपेक्षा भाजपावाले जास्त उगाळत बसतात, ही वस्तुस्थिती आहे. पुण्याच्या सांस्कृतिक परिघाशी अजितदादा पाहिजे तेवढे एकरूप झालेले दिसत नाहीत, हे सुद्धा मान्य करावे लागेल !

### अजितदादांच्या कामाची तडफ..

पुण्याच्या विकासाच्या बैठका घेत असताना दूरगामी अर्थकारणावर परिणाम काय होईल आणि त्यातून प्रत्यक्षात पैशाची निर्मिती कशी होईल, सरकारची आणि 'संबंधीत घटकांची' पोतडी कशी भरेल, याकडे अजितदादांचा कटाक्ष असतो. इतकेच नव्हे तर सांगितलेले काम अधिकाऱ्यांनी केले का? ते मुदतीत केले का? हे सांगण्याची 'दुसरी यंत्रणा' अजितदादा नेहमी तयार करतात आणि त्याचे ते 'रिपोर्टिंग कम ब्रीफिंग' घेत राहतात. एक मर्यादित मतदार संघ किंवा मर्यादित कार्यकर्त्यांचा किंवा समाजाचा वर्ग न धरता पुण्याच्या प्रत्येक भागात कार्यकर्ता निर्माण करण्याची अजितदादांची धडपड असते. इतकेच नव्हे तर वैयक्तिक कामे आणि कार्यकर्त्यांची मने जपण्यापेक्षा धोरणात्मक निर्णय घेणारे आपले व्यक्तिमत्व आहे, हे ठसविण्यात ते यशस्वी झाले आहेत. ही किमया चंद्रकांतदादा यांना मात्र साधता आलेली नाही.

### अजितदादांना शीतयुद्ध मान्य नाही..

अजितदादांना कुठल्याही शीत युद्धाचा सामना करावा लागत नाही. ते बेधडक निर्णय घेतात. अधिकाऱ्यांची भीड भाड ठेवत नाहीत. त्यांचा आवाका फार मोठा असल्यामुळे अनेकदा त्यांना टीकेला आणि वैयक्तिक नाराजीला सामोरे जावे लागते, परंतु एक व्यापक लोकनेता म्हणून त्यांची प्रतिमा जन माणसावर ठसते. मदत मागायला आलेल्याचे चेहरे आणि त्याची भविष्यातील उपयुक्तता पाहून वैयक्तिक स्तरावर खिशात हात घालून मदत करणार नेता म्हणून अजितदादांची ओळख आहे, ही दानत अन्य कुणामध्ये नाही. प्रशासनातील अंतिम शब्द सुद्धा अजितदादांना माहीत आहे, त्यामुळे प्रशासकीय अधिकाऱ्यांवर त्यांचा प्रचंड वचक आहे.

### अंगावर, शिंगावर घेणारा नेता..

अंगावर आल्यावर शिंगावर घेणारा नेता म्हणून अजितदादांची ओळख आहे. सभ्यतेच्या, सामोपचाराच्या मर्यादा त्यांनी कधी पाळल्या नाहीत. तथापि, हे दोन्ही दादा पुण्याचे काळजी वाहणारे , पुण्यासाठी प्रामाणिकपणे काम करणारे 'पुण्याचे नेते' होण्यासाठी धडपडणारे विधायक नेते आहेत . परंतु, दोघांच्या मर्यादा लक्षात घेतल्या तर दोघांच्याही कार्यशैली भिन्न आहेत. एक कमालीचा साधासुधा आणि एक प्रचंड आक्रमक! त्यामुळेच कदाचित दोघांनाही एकमेकांची 'दादागिरी' मान्य नसावी, नेमक्या याच मुद्द्यावर देवेंद्र फडणवीस यांनी बोट ठेवले असून अजितदादांनी जरा सबुरीने घ्यावे, हा संदेश दिला नसावा ना?

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

आदेश

## पालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ठाकरे यांचे आदेश

# सर्व जागांवर तयारी करा : उद्धव ठाकरे

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**महापालिका निवडणुकांत शिवसेना (ठाकरे) व महाराष्ट्र नवनिर्माणसेना युती होणार अशी चर्चा असली तरी .सर्व जागा लढण्याची तयारी करा, असे आदेश शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पदाधिकाऱ्यांनी मंगळवारी दिले. युतीचा निर्णय पक्ष ठरवेल, तुम्ही कामाला लागा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.**

### मुख्यमंत्री फडणवीसांचे स्पष्टीकरण



आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मातोश्री निवासस्थानी पार पडलेल्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत उद्धव ठाकरे यांनी सर्व जागांवर तयारी करण्याचे आदेश दिले. त्याचप्रमाणे मनसेसोबतच्या युतीबाबत योग्यवेळी निर्णय घेतला जाईल व सर्वांना तो कळवलाही जाईल, असे उद्धव ठाकरे यांनी स्पष्ट केले. या बैठकीत मुंबई महानगर परिसरातील ७ महापालिकांच्या परिस्थितीचा आढावा त्यांनी घेतला. ठाणे, कल्याण-डोंबिवली, मीरा-भाईंदर, नवी मुंबई, उल्हासनगर, भिवंडी, वसई-विरार या महापालिकांतील पक्षीय बलाबलाची माहिती त्यांनी तेथील पदाधिकाऱ्यांकडून घेतली.निवडणुकांची घोषणा लवकरच होईल. महापालिका निवडणुकांच्या दृष्टिकोनातून संघटनात्मक बांधणी करा. न्यायालयाच्या निर्णयानुसार नव्या प्रभाग रचनेनुसार ज्या निवडणुका होणार आहेत त्याकडे लक्ष ठेवा. ज्या गोष्टी घडत आहेत. त्याकडे विशेष लक्ष द्या, अशा सूचना त्यांनी केल्या. मनसे सोबतच्या युतीचा निर्णय योग्यवेळी घेतला जाईल. त्याबद्दलची माहितीदेखील सर्वांना दिली जाणार असल्याचे उद्धव ठाकरे यांनी स्पष्ट केले.राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे स्थानिक स्वराज्य संस्था एकत्र लढले तर राज्यातील अनेक महापालिकांत आमची सवा नक्कीच येईल. आमच्या कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे. त्यामुळे दोघे एकत्र आले तर मुंबई, ठाणे, कल्याण, पुणे, नाशिकमध्ये बहुमत प्राप्त करू, असे शिवसेना (ठाकरे) नेते संजय राऊत म्हणाले. राज ठाकरे महाविकास आघाडीचा भाग होतील का, या प्रश्नावर मात्र त्यांनी काही बोलणे टाळणे. तो पुढचा प्रश्न असल्याचे ते म्हणाले.आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मातोश्री निवासस्थानी पार पडलेल्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत उद्धव ठाकरे यांनी सर्व जागांवर तयारी करण्याचे आदेश दिले. त्याचप्रमाणे मनसेसोबतच्या युतीबाबत योग्यवेळी निर्णय घेतला जाईल व सर्वांना तो

### सत्ता नक्की – संजय राऊत

स्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मातोश्री निवासस्थानी पार पडलेल्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत उद्धव ठाकरे यांनी सर्व जागांवर तयारी करण्याचे आदेश दिले. त्याचप्रमाणे मनसेसोबतच्या युतीबाबत योग्यवेळी निर्णय घेतला जाईल व सर्वांना तो कळवलाही जाईल, असे उद्धव ठाकरे यांनी स्पष्ट केले. या बैठकीत मुंबई महानगर परिसरातील ७ महापालिकांच्या परिस्थितीचा आढावा त्यांनी घेतला.

कळवलाही जाईल, असे उद्धव ठाकरे यांनी स्पष्ट केले. या बैठकीत मुंबई महानगर परिसरातील ७ महापालिकांच्या परिस्थितीचा आढावा त्यांनी घेतला. ठाणे, कल्याण-डोंबिवली, मीरा-भाईंदर, नवी मुंबई, उल्हासनगर, भिवंडी, वसई-विरार या महापालिकांतील पक्षीय बलाबलाची माहिती त्यांनी तेथील पदाधिकाऱ्यांकडून घेतली.निवडणुकांची घोषणा लवकरच होईल. महापालिका निवडणुकांच्या दृष्टिकोनातून संघटनात्मक बांधणी करा. न्यायालयाच्या निर्णयानुसार नव्या प्रभाग रचनेनुसार ज्या निवडणुका होणार आहेत त्याकडे लक्ष ठेवा. ज्या गोष्टी घडत आहेत. त्याकडे विशेष लक्ष द्या, अशा सूचना त्यांनी केल्या. मनसे सोबतच्या युतीचा निर्णय योग्यवेळी घेतला जाईल. त्याबद्दलची माहितीदेखील सर्वांना दिली जाणार असल्याचे उद्धव ठाकरे यांनी स्पष्ट केले.राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे स्थानिक स्वराज्य संस्था एकत्र लढले तर राज्यातील अनेक महापालिकांत आमची सवा नक्कीच येईल. त्यामुळे दोघे एकत्र आले तर मुंबई, ठाणे, कल्याण, पुणे, नाशिकमध्ये बहुमत प्राप्त करू, असे शिवसेना (ठाकरे) नेते संजय राऊत म्हणाले. राज ठाकरे महाविकास आघाडीचा भाग होतील का, या प्रश्नावर मात्र त्यांनी काही बोलणे टाळणे. तो पुढचा प्रश्न असल्याचे ते म्हणाले.महापालिका निवडणुकांत शिवसेना (ठाकरे) व महाराष्ट्र नवनिर्माणसेना युती होणार अशी चर्चा असली तरी .सर्व जागा तयारी करा, असे आदेश ठाकरे यांनी पदाधिकाऱ्यांनी दिले.

# घरगडी समजणाऱ्यांना जागा दाखवली

## एकनाथ शिंदे यांचा उद्धव ठाकरे यांचे नाव न घेता टोला

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**ज्यांनी कावड यात्रेकडे पाठ फिरवली, जे लोक कार्यकर्त्यांना कस्पटासमान वागवतात, घरगडी समजतात, त्यांना जागा दाखवली. आम्ही सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आलो नसलो तरी सर्वसामान्यांना सोन्याचे दिवस आणण्याचे प्रयत्न करणे, हेच आमचे उद्दिष्ट असल्याचे सांगत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी तयार रहावे, असे आवाहन केले.**



शिंदेसेनेचे आमदार संतोष बांगर यांच्या कावड यात्रेचा समारोप कार्यक्रम हिंगोली येथील महात्मा गांधीपुतळा चौकात सोमवारी झाला. कार्यक्रमास आमदार बाबुराव कोहळीकर, हेमंत पाटील, माजी खासदार सुभाष वानखेडे, राजेंद्र शिखरे यांच्यासह शिवसेनेतील नेत्यांची उपस्थिती होती. 'आमदार बांगर यांनी काही जणांना कावडयात्रेसाठी बोलावले होते. परंतु, त्यांनी कावड यात्रेकडे पाठ फिरवली होती. ज्यांना कावडीत बसायचे होते ते कावड यात्रेला कसे येणार, असा टोला एकनाथ शिंदे यांनी लगावला. राज्यातील काही जण कार्यकर्त्यांना

### अफवा पसरवण्यात आल्या

त्यांनीच सत्तेची स्वप्ने पाहणाऱ्यांना जागा दाखवली. म्हणूनच जाहिरनाम्यातील सर्व योजना टप्प्याटप्प्याने पूर्ण करणार असल्याचे यावेळी त्यांनी स्पष्ट केले.काँग्रेसच्या काळात झालेल्या बॉम्बस्फोटाच्या वेळी काँग्रेसची मंडळी दहशतवादाला धर्म नसतो, असे सांगत होते. मात्र, मालेगाव स्फोटाला भगवा दहशतवाद म्हटले. मतांसाठी व्होट बँक वाचविण्यासाठी किती लाचारी करणार.

घरगडी म्हणून वागवितात. मात्र, आम्ही सर्वसामान्यांसोबत राहून विकासकामे करणारे आहोत, असेही शिंदे म्हणाले. राज्याला पुढे नेण्याचे काम करायचे आहे, असे शिंदे म्हणाले. आम्ही सोन्याचा चमचा तोंडात घेऊन जन्मलो नसलो तरी जनतेला, सर्वसामान्यांना सोन्याचे दिवस आणण्याचे प्रयत्न करणार असून, हाच आमचा अजेंडा असल्याचे ते म्हणाले. आमचा जाहीरनामा म्हणजे चुनावी जुमला असल्याचा आरोप काही जणांकडून करण्यात आला. लाडकी बहीण योजनासंबंधी अफवा पसरवण्यात आल्या. परंतु, लाडकी बहीण योजना बंद होणारच नाही.

विरोध

## ‘एसआयआर’च्या विषयावर चर्चा करण्याची मागणी

# सदन तुम्ही चालवता की अमित शहा?

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**राज्यसभेच्या सभागृहात केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाचे (सीआयएसएफ) जवान तैनात केल्याच्या विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांच्या आरोपांनंतर मंगळवारी प्रचंड गदारोळ झाला. सभागृहात जवान आणून विरोधकांची गळचेपी करत असल्याच्या मुद्द्यावरून विरोधक आणि सत्ताधाऱ्यांमध्ये आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झाडल्या. त्यातच, “हे सदन तुम्ही चालवत आहात की, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा,” असा प्रश्न उपसभापतींना करून खरगेंनी संसदेच्या स्वायत्ततेवरच बोट ठेवले.**

## सीआयएसएफ’चे जवान सभागृहात




सभागृहामध्ये ‘सीआयएसएफ’चे जवान तैनात केल्याचा आरोप उपसभापती हरिवंश, सभागृहाचे नेते जे. पी. नड्डा तसेच केंद्रीय संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजू यांनी फेटाळला. हे ‘सीआयएसएफ’चे जवान नसून संसदेच्या सुरक्षा व्यवस्थेतील मार्शल होते. सभापती वा पीठासीन अधिकाऱ्यांला गरज असेल तेव्हा मार्शलना सभागृहात बोलावण्याचा अधिकार आहे, असे हरिवंश यांनी स्पष्ट केले. खरगेंनी चुकीचा आरोप केला असून नियंमभंग केल्याप्रकरणी त्यांच्यावर कारवाईही केली जाऊ शकते, असा मुद्दा रिजिजू यांनी मांडला. मात्र, ‘सीआयएसएफ’चे जवान सभागृहात तैनात केले गेले, असे सांगत खरगेंनी आरोप मागे घेण्यास नकार दिला.राज्यसभेमध्ये गेल्या शुक्रवारी ‘एसआयआर’च्या विषयावर चर्चा करण्याची मागणी काँग्रेससह विरोधी पक्षांनी केली होती. त्यावरून इंडिया आघाडीचे सदस्य सभापतींच्या समोरील जागेवर येऊन घोषणाबाजी करत होते. विरोधकांना अडवण्यासाठी उपसभापतींनी मार्शलना सभागृहात सुरक्षेसाठी तैनात केले. हे मार्शल संसदेच्या सुरक्षा यंत्रणेतील नसून ‘सीआयएसएफ’चे जवानच होते, असे खरगेंचे म्हणणे होते. सभागृहात विरोधकांना मुद्दा उपस्थित करण्याचा अधिकार असताना मार्शल कशासाठी तैनात केले, असा प्रश्न खरगेंनी केला. ‘सीआयएसएफ’चे जवान तैनात करण्यावर खरगेंनी आक्षेप घेत उपसभापतींना पत्रही लिहिले होते. त्यावर उपसभापती हरिवंश यांनी मंगळवारी तीव्र आक्षेप घेतला.राज्यसभेचे तत्कालीन विरोधी पक्षनेते अरुण जेटली यांनीही सभागृहात गोंधळ घालणे हा लोकशाहीचाच एक प्रकार असल्याचे सांगितले होते. आता मात्र सत्ताधारी भाजपला विरोधकांनी गोंधळ घालणे लोकशाहीविरोधी वाटू लागले आहे, असा मुद्दा खरगेंनी मांडला. त्यावर, “गोंधळ घालण्याचेही वेगवेगळे प्रकार असतात. विरोध कसा करायचा हे माझ्याकडून शिका. मी ४० वर्षे विरोधी पक्षात राहिलो आहे, त्यामुळे तुम्ही माझी शिकवणी लावा. आत्ता तर आम्ही सत्तेत येऊन १०-११ वर्षे झाली आहेत. तुम्ही अजून ३०-४० वर्षे विरोधी बाकांवरच बसणार आहात,” असा आक्रमक प्रतिवाद करत सभागृहाचे नेते जे. पी. नड्डा यांनी हरिवंश यांची पाठराखण करण्याचा प्रयत्न केला.राज्यसभेचे तत्कालीन विरोधी पक्षनेते अरुण जेटली यांनीही सभागृहात गोंधळ घालणे हा लोकशाहीचाच एक प्रकार असल्याचे सांगितले होते. आता मात्र सत्ताधारी भाजपला विरोधकांनी गोंधळ घालणे लोकशाहीविरोधी वाटू लागले आहे, असा मुद्दा खरगेंनी मांडला. त्यावर, “गोंधळ घालण्याचेही वेगवेगळे प्रकार असतात. विरोध कसा करायचा हे माझ्याकडून शिका. मी ४० वर्षे विरोधी पक्षात राहिलो आहे, त्यामुळे तुम्ही माझी शिकवणी लावा. आत्ता तर आम्ही सत्तेत येऊन १०-११ वर्षे झाली आहेत. तुम्ही अजून ३०-४० वर्षे विरोधी बाकांवरच बसणार आहात,” असा आक्रमक प्रतिवाद करत सभागृहाचे नेते जे. पी. नड्डा यांनी हरिवंश यांची पाठराखण करण्याचा प्रयत्न केला.त्यामुळे सभागृहात सैन्याला आणले जाईल.‘सीआयएसएफ’चे जवान, दिल्ली पोलिसांना आणले जाईल असे म्हणणे चुकीचे आहे. खरगे देशाची दिशाभूल करत आहेत.

## विरोध कसा करायचा हे शिका

राज्यसभेचे तत्कालीन विरोधी पक्षनेते अरुण जेटली यांनीही सभागृहात गोंधळ घालणे हा लोकशाहीचाच एक प्रकार असल्याचे सांगितले होते. आता मात्र सत्ताधारी भाजपला विरोधकांनी गोंधळ घालणे लोकशाहीविरोधी वाटू लागले आहे, असा मुद्दा खरगेंनी मांडला. त्यावर, “गोंधळ घालण्याचेही वेगवेगळे प्रकार असतात. विरोध कसा करायचा हे माझ्याकडून शिका.

# तेज प्रताप यादव यांचा तेजस्वीना धक्का?

## ‘राजद’मधील हकालपट्टीनंतर ‘या’ पक्षांबरोबर युतीची घोषणा

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**राष्ट्रीय जनता दलाचे (RJD) अध्यक्ष लालू प्रसाद यादव यांनी काही दिवसांपूर्वी त्यांचे पुत्र तेज प्रताप यादव यांची पक्षातून हकालपट्टी केली होती. तसेच तेज प्रताप यादव यांना कुटुंबातूनही बेदखल केल्याचं लालू प्रसाद यादव यांनी सांगितलं होतं. राष्ट्रीय जनता दल पक्षामधून हकालपट्टी झाल्यानंतर आगामी विधानसभा निवडणूक तेज प्रताप यादव हे अपक्ष लढणार असल्याची घोषणा त्यांनी काही दिवसांपूर्वी केली होती.**



दरम्यान, तेज प्रताप यादव यांनी आता आणखी एक मोठा निर्णय घेतला आहे. तेज प्रताप यादव यांनी आगामी बिहार विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ५ पक्षांबरोबर युतीची घोषणा केली आहे. त्यामुळे तेज प्रताप यादव यांचा हा तेजस्वी यादवांना धक्का तर नाही ना? असा सवाल आता राजकीय वर्तुळात उपस्थित केला जात आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.आगामी बिहार विधानसभा निवडणुकीच्या तेज प्रताप यादव यांनी पार्श्वभूमीवर ५ पक्षांबरोबर युतीची घोषणा केल्यानंतर पाचही घटक पक्षांच्या राष्ट्रीय अध्यक्षांसह पत्रकार परिषदेत घेत त्यांनी या निर्णयाची माहिती दिली. तेज प्रताप यादव यांनी म्हटलं की, “युतीचे उद्दिष्ट सामाजिक न्याय, हक्क आणि राज्याच्या विकासाचे समर्थन करणे आहे.

लोक माझी थट्टा करण्यास मोकळे आहेत. पण मी माझ्या मार्गाने चालेन”, असं तेज प्रताप यादव यांनी म्हटलं आहे.तेज प्रताप यादव यांनी काही दिवसांपूर्वी पाटणा येथील एका पत्रकार परिषदेत बोलताना सांगितलं होतं की, ते विधानसभेची निवडणूक कोणत्याही पक्षातून नाही तर अपक्ष लढवणार आहेत.

## तेज प्रताप यादव काय म्हणाले?

तसेच बिहारमधील महुआ विधानसभा मतदारसंघातून अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवणार असल्याचं तेज प्रताप यादव यांनी सांगितलं होतं.३७ वर्षीय तेज प्रताप यादव हे लालू प्रसाद यादव यांचे ज्येष्ठ सुपुत्र आहेत. त्यांच्यानंतर तेजस्वी यादव हा लहान मुलगा आहे. २०१८ साली माजी मुख्यमंत्री दरोगा रॉय यांची नात ऐश्वर्या रॉय हिच्याशी त्यांचे लग्न झाले होते.

# पत्नीला पाहून खिलाडी अक्षय खळखळून हसला

अभिनेता अक्षय कुमारची (AKSHAY KUMAR) पत्नी ट्विंकल खन्ना (TWINKLE KHANNA) ही सोशल मीडियावर खूप ॲक्टीव असते. ट्विंकल आणि अक्षय हे त्यांच्या कुटुंबासह सुट्टीसाठी मालदीवला गेली आहे. जिथे ट्विंकलनं तिच्या संपूर्ण कुटुंबासोबत वाढदिवस देखील साजरा केला. ट्विंकलने आता एक व्हिडीओ शेअर केला आहे ज्यामध्ये मालदीवमध्ये तिच्यासोबत घडलेली एक मजेशीर घटना दिसत आहे. ट्विंकलनं या व्हिडीओला खास कॅप्शन देखील दिलं आहे. ट्विंकलनं शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये संपूर्ण ट्रीपची खास झलक दाखवली आहे. या व्हिडीओच्या सुरुवातीला ट्विंकल सायकल चालवताना दिसते सायकलिंग करताना तिचा तोल जातो आणि ती एका खांबाला धडकते, असं या व्हिडीओमध्ये दिसत आहे. अशातच पत्नीला खांबाला धडकताना पाहून अक्षय कुमार खळखळून हसतो. ट्विंकलनं इन्स्टाग्रामवर शेअर केलेल्या मालदीव ट्रीपच्या व्हिडीओला कॅप्शन दिलं, 'माझी सायकल खांबाला धडकण्या व्यतिरिक्त, ही ट्रीप मला खरोखरच स्वर्गात गेल्यासारखी वाटली.तुमच्याकडे नवीन वर्षासाठी कोणतेही मोठे संकल्प असतील तर ते खाली कमेंटमध्ये शेअर करुन इतरांना प्रेरणा द्या' ट्विंकलनं शेअर केलेल्या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला आहे. ट्विंकलनं शेअर केलेल्या या व्हिडिओमध्ये तुम्हाला ट्विंकलच्या वाढदिवसाच्या सेलिब्रेशनची झलकही पाहायला मिळेल. ज्यामध्ये ती केक कट करताना दिसत आहे. याशिवाय ट्विंकलनं तिथे तिच्या पुस्तकाची सक्सेस पार्टीही ठेवली

# रिंकूनं दिलेल्या उत्तरांनी अनेकांचे लक्ष वेधले

अभिनेत्री रिंकू राजगुरू (RINKU RAJGURU) ही तिच्या अभिनयानं नेहमीच प्रेक्षकांची मनं जिंकते. सैराट चित्रपटातून अभिनय क्षेत्रात पदार्पण करणाऱ्या रिंकूनं प्रेक्षकांच्या मनात विशेष स्थान निर्माण केलं आहे. रिंकू ही सोशल मीडियावर ॲक्टिव असते. रिंकूनं इन्स्टाग्रामवर नेटकऱ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं दिली आहे. रिंकूनं दिलेल्या उत्तरांनी अनेकांचे लक्ष वेधले आहे. 'तुझं टोपणनाव काय आहे?' असा प्रश्न एका नेटकऱ्यानं रिंकूला इन्स्टाग्रामवर विचारला. या प्रश्नाला रिंकूनं उत्तर दिलं, 'रिंकू' त्यानंतर आणखी एका नेटकऱ्यानं रिंकूला प्रश्न विचारला, 'रिंकू हे तुझं टोपणनाव आहे तर मग तुझं खरं नाव काय आहे?' या प्रश्नाचं रिंकूनं उत्तर दिलं, 'प्रेरणा' रिंकूचं खरं नाव प्रेरणा आहे, हे अनेकांना माहित नसेल. 'झिम्मा-2 नंतर कोणता नवा प्रोजेक्ट येणार?' असा प्रश्न देखील एका युझरनं रिंकूला विचारला. या प्रश्नाला तिनं उत्तर दिलं, 'लवकरच कळवते.' 2023 मधील तुझी सर्वात आवडती आठवण कोणती? असा प्रश्न एका नेटकऱ्यानं विचारला. या प्रश्नाचं रिंकूनं केदारनाथच्या मंदिराजवळील फोटो शेअर करुन उत्तर दिलं. रिंकूचा झिम्मा-2 हा चित्रपट काही महिन्यांपूर्वी रिलीज झाला. या चित्रपटानं बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला. या चित्रपटात रिंकूसोबतच सुहास जोशी, निर्मिती सावंत,क्षिती जोग,सुचित्रा बांदेकर,सयाली संजीव आणि शिवानी सुर्वे या कलाकारांनी देखील प्रमुख भूमिका साकारली आहे.

# प्राजक्ता माळीचं हटके सेलिब्रेशन



अभिनेत्री प्राजक्ता माळी (PRAJAKTTA MALI) ही सोशल मीडियावर ॲक्टिव असते. प्राजक्ताच्या सोशल मीडियावरील पोस्ट नेटकऱ्यांचे लक्ष वेधतात. नुकताच प्राजक्तानं एक खास व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये प्राजक्ता ही तिच्या कुटुंबासोबत 31 डिसेंबरचं सेलिब्रेशन करताना दिसत आहे. प्राजक्तानं शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये ती कुटुंबासोबत ॲनिमल या चित्रपटामधील 'जमाल कुडू' या गाण्यावर डान्स करताना दिसत आहे. प्राजक्तानं डोक्यावर एक ग्लास ठेवलेला दिसत आहे. तसेच प्राजक्तानं तिच्या कुटुंबासोबत 'मै हूं डॉन' या गाण्यावर देखील डान्स केला. व्हिडीओमध्ये प्राजक्ता ही चुलीजवळ बसून भाकऱ्या थापताना देखील दिसत आहे. या व्हिडीओला प्रजक्तानं कॅप्शन दिलं, "ABOUT 31ST DECEMBER, आमचे बॉबी देओलS आणि डॉनS... यात माझा 2023 चा शेवटचा सेल्फी आणि 2024 चा पहिला सेल्फी देखील आहे." प्राजक्तानं शेअर केलेल्या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव देखील केला आहे. एका नेटकऱ्यानं प्राजक्ताच्या व्हिडीओला कमेंट केली, "प्राजक्ता..खूपच भारी आहेस तू.कुटुंबाबरोबर जे तुझे क्षण असतात त्यांत तू खूप खुश, सुंदर दिसतेस. प्राजक्ता सर्व गुण संपन्न मुलगी." तर दुसऱ्या युझरनं कमेंट केली, "असेच क्षण जपायचे असतात प्राजक्ता आणि तू ते खुप भारी जपतेस THAT'S WE LOVE YOU . तू भाकरी करतानाचा पूर्ण व्हिडीओ टाक ना . मी मागे म्हटले होते ना की तु A।। ROUNDER आहेस तला भाकरी करतांना पाहून ते सिद्ध झाले.

# 'खुर्ची' चा जबरदस्त ट्रेलर रिलीज

अभिनेता अक्षय वाघमारे (AKSHAY WAGHMARE) आणि राकेश बापट (RAQESH BAPAT) यांच्या 'खुर्ची' (KHURCHI) या चित्रपटाचा ट्रेलर रिलीज झाला आहे. या ट्रेलरमधील डायलॉग्सनं आणि कलाकारांच्या अभिनयानं प्रेक्षकांचे लक्ष वेधले आहे. या ट्रेलरला नेटकऱ्यांची पसंती मिळत आहे. खुर्ची या चित्रपटाच्या ट्रेलरची सुरुवात "मी राजवीर राजाराम देसाई,एक दिवस खुर्ची आपलीच असणार" या डायलॉगनं होते. त्यानंतर ट्रेलरमध्ये अक्षय वाघमारेची एन्ट्री होते. ट्रेलरमध्ये अक्षयचा "पाहिजे, पाहिजे, भिती पाहिजे." हा डायलॉग ऐकू येतो. अक्षय हा खुर्ची या चित्रपटात सम्राट ही भूमिका साकारत आहे. 'खुर्ची' या बहुप्रतीक्षित चित्रपटात राकेश बापट, अक्षय वाघमारे, आर्यन हगवणे, प्रीतम कागणे, श्रेया पासलकर, महेश घाग, कल्याणी नंदकिशोर, सुरेश विश्वकर्मा हे कलाकार महत्वपूर्ण भूमिकेत दिसणार आहेत. चित्रपटाच्या ट्रेलरवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला आहे. खुर्ची या चित्रपटाचा ट्रेलर लॉंच इव्हेंट नुकताच पार पडला. या इव्हेंटला चित्रपटातील कलाकारांनी हजेरी लावली. तसेच अक्षय वाघमारेच्या पत्नीनं देखील या इव्हेंटला हजेरी लावली. 'खुर्ची' या चित्रपटाच्या दिग्दर्शनाची धुरा शिव धर्मराज माने आणि संतोष कुसुम हगवणे यांनी सांभाळली आहे. हा चित्रपट 12 जानेवारीला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. काही दिवसांपूर्वी खुर्ची या चित्रपटाचा टीझर रिलीज झाला होता. या टीझरनं देखील अनेकांचे लक्ष वेधले होते. राजकारणाचे विविध रंग या चित्रपटात रेखाटण्यात आले आहेत. चित्रपटाची गाणी प्रशांत मडपुवर, सौरभ आणि सोमनाथ शिंदे यांनी लिहिली असून, त्यांना सन्मित वाघमारे, अभिषेक काटे यांनी संगीत दिले आहे. आदर्श शिंदे, अवधूत गुप्ते, अभय जोधपुरकर, रसिका वाखरकर, अमिता घुगरी आणि आर्यन यांनी या चित्रपटातील गाणी गायली आहेत. आता 'खुर्ची' या चित्रपटाची प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघत आहेत.

# 'ओरी'ची पलकनं का मागितली माफी?




गेल्या काही दिवसांपासून ओरी (ORRY) म्हणजेच ओरहान अवत्रामणीहा सोशल मीडियावर चर्चेत आहे. अशी कोणतीही सेलिब्रिटींची पार्टी नाही, ज्यामध्ये ओरी गेला नाही. ओरी प्रत्येक पार्टीचे फोटो सोशल मीडियावर शेअर करतो. त्या फोटोमध्ये त्याच्यासोबत वेगवेगळे सेलिब्रिटी देखील असतात. अशातच आता हा सध्या ओरी पार्टीमुळे नाही तर वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आहे. अभिनेत्री पलक तिवारी (PALAK TIWARI) आणि ओरीचे व्हॉट्सॲप चॅट सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. दोघांच्या या व्हॉट्सॲप चॅटनं अनेकांचे लक्ष वेधले आहे. ओरी आणि पलक तिवारी यांच्या सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हॉट्सॲप चॅटमध्ये पलक ही ओरीची माफी मागताना दिसत आहे. पलकनं ओरीला मेसेज केला, "ओरी, मी पलक बोलत आहे. मी तुझी माफी मागावी, असं तुला वाटत आहे का?" यावर ओरीनं इमोजी शेअर करुन रिप्लाय दिला. ओरीच्या मेसेजनंतर पलकनं रिप्लाय दिला, "मी साराच्या सन्मानार्थ बोलत आहे." यावर ओरीनं रिप्लाय दिला, 'एकतर तू स्वाभिमानाने माफी मागत आहेस कारण तुला कसं बोलावं कळत नाही' आता पलकनं ओरीची माफी का मागितली? हा प्रश्न नेटकऱ्यांना पडला आहे. ओरी आणि पलक तिवारी यांच्या सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हॉट्सॲप चॅटमध्ये साराच्या नावाचा देखील उल्लेख आहे. ही सारा अली खान आहे, असा अंदाज नेटकरी लावत आहे. सारा अली खानचा भाऊ इब्राहिम अली खानला पलक डेट करत आहे, अशी चर्चा गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर होत आहे. पलक आणि इब्राहिम या दोघांना अनेक वेळा एकत्र स्पॉट देखील करण्यात आलं आहे. द वर्जीन ट्री या चित्रपटामधून पलक प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात मौनी रॉय आणि संजय दत्त हे देखील महत्वाची भूमिका साकारणार आहेत. तिचा किसी का भाई किसी की जान हा चित्रपट गेल्या वर्षी रिलीज झाला. तसेच इब्राहिम हा सरजमीन या चित्रपटामधून बॉलिवूडमध्ये पदार्पण करणार आहे, असंही म्हटलं जात आहे. गेल्या काही दिवसांपासून ओरी (ORRY) म्हणजेच ओरहान अवत्रामणी हा सोशल मीडियावर चर्चेत आहे. अशी कोणतीही सेलिब्रिटींची पार्टी नाही, ज्यामध्ये ओरी गेला नाही. ओरी प्रत्येक पार्टीचे फोटो सोशल मीडियावर शेअर करतो. त्या फोटोमध्ये त्याच्यासोबत वेगवेगळे सेलिब्रिटी देखील असतात. अशातच आता हा सध्या ओरी पार्टीमुळे नाही तर वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आहे. अभिनेत्री पलक तिवारीआणि ओरीचे व्हॉट्सॲप चॅट सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. दोघांच्या या व्हॉट्सॲप चॅटनं अनेकांचे लक्ष वेधले आहेआणि पलक तिवारी यांच्या सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या चॅटमध्ये पलक ही ओरीची माफी मागताना दिसत आहे.

आईची प्रार्थना

## वडिलांच्या कबरीला भेट आणि रोनाल्डोचे सामने

# सिराजच्या यशाची त्रिसूत्री!

।नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**ओव्हल कसोटीत मोहम्मद सिराजने ९ विकेट्स पटकावत भारतीय संघाच्या विजयात निर्णायक भूमिका बजावली. पाचही सामने खेळत अद्भुत फिटनेसचा प्रत्यय घडवत सिराजने १८५ षटकं टाकत २३ विकेट्स पटकावल्या. ओव्हल कसोटीत ९ विकेट्ससह थरारक विजयाचा सिराज शिल्पकार ठरला.**

मोहम्मद सिराजसाठी कोणत्याही दौऱ्यापूर्वी आणि दौरा झाल्यानंतर वडिलांच्या कबरीला भेट देणं हे आन्हिक पक्कं. कोणत्याही दौऱ्यासाठी रवाना होण्यापूर्वी सिराजने कबरीपाशी जातो आणि त्यांचे आशीर्वाद घेतो. दौरा संपवून तो हैदराबादमध्ये परतला की विमानतळावरून थेट कबरीस्थळी जातो. त्यांना आदरपूर्वक वंदन करूनच तो घरी परततो.२०२१ मध्ये भारतीय संघ ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर असताना सिराजच्या वडिलांचं निधन झालं. तेव्हापासून त्याचं हे आन्हिक पक्कं होऊन गेलं आहे. सिराजचे

### 'सिराजचं वडिलांवर प्रचंड प्रेम



वडील रिक्षा चालवायचे. सिराजचं क्रिकेटपटू होण्याचं स्वप्न प्रत्यक्ष साकारण्यात वडिलांचा सिंहाचा वाटा आहे. 'टाईम्स ऑफ इंडिया'शी बोलताना सिराजची आई आणि भावाने त्याच्या वाटचालीविषयी सविस्तर माहिती दिली.जून महिन्यात इंग्लंडला रवाना होण्यापूर्वी सिराजने त्याचं सामान भरलं. आईला मिठी मारली आणि म्हणाला, 'आई-तुझ्या आशिर्वादाची गरज आहे. मी चांगलं खेळेन आणि भारताला जिंकून देईन. मला भारतासाठी सर्वोत्तम कामगिरी करायची आहे'. यानंतर तो वडिलांच्या कबरीपाशी पोहोचला. त्यांच्या स्मृतीला अभिवादन करून सिराज विमानतळाच्या दिशेने रवाना झाला.'सिराजचं वडिलांवर प्रचंड प्रेम होतं. वडिलांचाही तो लाडका होता. त्यांच्यासाठी तो काहीही करायला तयार असे. माझ्या सदिच्छा कायम त्याच्याबरोबर आहेत. परमेश्वर त्याच्या पाठीशी राहो आणि असंच यश मिळत राहो', असं सिराजच्या आई शबाना बेगम यांनी सांगितलं.

शबाना सिराजचा प्रत्येक सामना पाहतात. अँडरसन-तेंडुलकर मालिकेचा प्रत्येक सामना त्यांनी समरसून पाहिला. सिराज खेळत असताना त्यांनी टाळ्या वाजवून, दिवसातून पाच वेळा प्रार्थना करत त्याला शुभेच्छा दिल्या. इस्लाम धर्मानुसार दिवसातून पाचवेळा नमाज पडतात. सिराज इंग्लंड दौऱ्यावर असताना शबाना यांनी प्रार्थनेची एकही वेळ चुकवली नाही. त्यांच्या प्रार्थनेचं बळ सिराजच्या कामगिरीत प्रतीत झालं. भारतीय संघाने पाच सामन्यांची मालिका २-२ अशी बरोबरीत सोडवली. सिराजने भारतीय गोलंदाजीचा प्रमुख या नात्याने पाचही कसोटी सामने खेळत संघाच्या विजयात निर्णायक भूमिका बजावली.

'आई नेहमीच सिराजसाठी प्रार्थना करत असे. तिच्या शुभेच्छांमध्ये खूप बळ आहे. आईवडिलांच्या सदिच्छा पाठीशी असल्याने तसंच त्यांच्या पाठिंब्याच्या जोरावरच सिराजने ही वाटचाल केली आहे. तो रोज आईला व्हीडिओ कॉल करतो. उत्तरोत्तर अशीच प्रगती करत राहा असा आशीर्वाद आई त्याला देते', असं सिराजचा भाऊ मोहम्मद इस्माईलने सांगितलं,वडील म्हणत असत की तुला मोठं नाव कमवायचं आहे. भारतासाठी खेळायचं आहे.

भारतीय संघ ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर असताना ते गेले. सिराजसाठी तो प्रचंड मोठा धक्का होता. त्याहीवेळेस अम्मीने त्याला सांगितलं की, जे व्हायचं होतं ते झालं. ते बदलता येणार नाही. आता तू सामन्यावर लक्ष केंद्रित करायला हवंस कारण वडिलांना तुला भारतासाठी खेळताना पाहायचं होतं.वडिलांच्या निधनाची बातमी प्रशिक्षक रवी शास्त्री आणि कर्णधार विराट कोहली यांनी ही वाईट बातमी सिराजला दिली. हे कळल्यानंतर सिराज भावुक झाला. त्या दोघांनी सिराजला सावरलं आणि आधार दिला. संघ सहकाऱ्यांनीही त्याची भेट घेत त्याला आधार दिला.

### २-२ अशी बरोबरीत सोडवली

वडिलांच्या अंत्यविधीसाठी मायदेशी परतण्याचा प्रस्ताव संघव्यवस्थापनाने सिराजला दिला होता. मात्र देशासाठी खेळणं हे प्राधान्य असल्याने सिराजने ऑस्ट्रेलियातच थांबून खेळण्याचा निर्णय घेतला. सिराजने या कठीण परिस्थितीतही खेळताना ३ सामन्यात १३ विकेट्स पटकावल्या. यामध्ये त्याने डावात ५ विकेट्स घेण्याचीरी करामत केली. त्याने हे पंचक वडिलांना समर्पित केलं.

## सिराज अखेरच्या षटकांमध्ये संतापला

# कर्णधार शुबमन गिलवरने सामन्यानंतर सांगितलं काय घडलं?

।नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मोहम्मद सिराज ओव्हल कसोटीत भारताच्या विजयाचा नायक ठरला. पाचव्या दिवशी टाकला गेलेला प्रत्येक चेंडू तितकाच महत्त्वाचा होता. संपूर्ण संघाने फिल्डिंग करतानाही आपलं १०० टक्के योगदान दिलं. सिराजने आपल्या भेदक गोलंदाजीने मोमेंटम भारताच्या दिशेने वळवला होता. पण अखेरच्या षटकांमध्ये एक असा क्षण आला होता जिथे सिराज कर्णधार गिलवरही संतापला होता. ज्याचा व्हीडिओ व्हायरल होत आहे.**



पाचव्या कसोटीत भारताच्या विजयानंतर शुबमन गिल आणि मोहम्मद सिराज पत्रकार परिषदेसाठी आले. तेव्हा पत्रकाराने त्याला विचारलं की शुबमन गिल तुझं ऐकतो की नाही. कारण तुमच्या दोघांमधील एक घटना आम्ही पाहिली, ज्यामध्ये सिराज तुझ्यावर संतापला होता आणि म्हणाला की, 'तू त्याला सांगितलं नाहीस का?'मोहम्मद सिराज या प्रश्नाचं उत्तर देताना म्हणाला, "आमच्यातील संवाद खूप चांगला आहे, आमच्यातील मैत्री पण चांगली आहे. आम्ही दोघंही भारतासाठी एकत्र खेळलो आहोत, तो गुजरात टायटन्सचा कर्णधार देखील आहे, म्हणून मी त्याला नीट ओळखतो आणि मी सांगितलेलं देखील तो ऐकतो."भारत आणि इंग्लंडमधील ओव्हल कसोटी सामना चांगलाच रोमांचक झाला. टीम इंडियाला विजयासाठी एका विकेटची गरज होती आणि इंग्लंडला ११ धावा करायच्या होत्या. दरम्यान टीम इंडियासमोर एटकिन्सनला धावबाद करण्याची एक संधी चालून आली होती, पण ती हुकली आणि एटकिन्सन एक धाव घेण्यात यशस्वी ठरला. ध्रुव जुरेलने वेळेत चेंडू फेकला खरा पण तो स्टम्पवर जाऊन आदळला नाही आणि सिराज संतापत गिलला म्हणाला, "तू त्याला

### हातातले ग्लोव्हज काढून ठेव

पाचव्या कसोटीत घडलेल्या या घटनेबाबत गिल म्हणाला, "हो, त्याने मला सांगितलं होतं की ध्रुवला सांग, हातातले ग्लोव्हज काढून ठेव, जेणेकरून रनआऊटची संधी आल्यास सोपं जाईल. तो रनआऊट हुकलेला पाहता सिराज संतापला आणि तो बोलला की, तू त्याला ग्लोव्हज काढायला सांगितलं नाही का? गिलचं बोलून होताच दोघंही पत्रकार परिषदेत हसू लागले. प


स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। बुधवार ।
। दि. 6 ऑगस्ट 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

DYP
DR. D. Y. PATIL COLLEGE OF PHARMACY

DR. D. Y. PATIL COLLEGE OF
PHARMACY, AKURDI, PUNE

NBA NATIONAL BOARD OF ACCREDITATION

ACCREDITED WITH GRADE A+ NAAC




Institute code : 6371

STUDENT INTAKE

| | |
|---|---|
| D. Pharm | 60 |
| F. Y. B Pharm | 100 |
| Pharm D | 30 |
| Pharm D (PB) | 10 |
| M Pharm ((Pharmaceutics) | 15 |
| M Pharm (Pharmaceutical Quality Assurance) | 15 |
| M Pharm (Pharmacology) | 15 |
| M Pharm (Regulatory Affairs) | 15 |
| M Pharm (Pharmaceutical Chemistry) | 06 |
| M Pharm (Phytopharmacy & Phytomedicine) | 09 |

www.dyppharmaakurdi.ac.in
@dypcopakurdipune


( Since 2013)
MASTER MIND GLOBAL
SCHOOL & Jr. College
(CBSE)
ADMISSIONS
OPEN FOR
NURSERY TO 12TH
Where There is
Creativity, There is
Master Mind
STAR
RANKING
Excellence in Education & Disciplined Environment
Co-Curricular & Extra Curricular Activities
Guaranteed Safety & Security
A++ Grade
In Leadership & Quality
Management
Contact : +91 7218125125
E-mail : mastermindglobalschool.com
Website : www.http://mastermindglobalschool.com

# महाविद्यालयीन शिक्षण घेतानाच स्पर्धा परीक्षांची तयारी करा-तावटे

## शिक्षण विश्व: भोसरीतील राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी । महाईन्यूज

**पुणे जिल्ह्याची लोकसंख्या दीड कोटींपर्यंत पोहोचली आहे. महाराष्ट्रातील मोठ्या शहरांमध्ये पुण्याची गणणा होते. त्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ पुण्यात स्थापन करण्याची मागणी शिवसेनेचे मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी केंद्रीय कायदा मंत्री अर्जुनराम मेघवाल यांच्याकडे केली आहे.**




राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लांडेवाडी, भोसरी येथील स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्राच्या वतीने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी कृषी आयुक्तालय उपसंचालक सुष्मिता नरेंद्र तावटे यांचे स्पर्धा परिक्षांची ओळख" या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाच्या प्रसंगी बोलताना त्या म्हणाल्या की, महाविद्यालयीन जीवनामध्येच स्पर्धा परिक्षेच्या तयारीला सुरुवात केली तर यशाचा मार्ग अधिक सुकर होतो .स्पर्धा परिक्षा पास होणे हा पहिला टप्पा आहे. स्पर्धा परिक्षा पास झाल्यानंतर खऱ्या अर्थाने कामाला सुरुवात होते. तेव्हा प्रमाणिक कामामधून समाधान मिळते. त्यांनी स्वानुभवातून सर्व विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. जे. कानडे हे होते.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा अभ्यासक्रम तयारी करत असताना आवश्यक त्या सर्व सोयी सुविधा महाविद्यालयांमध्ये उपलब्ध करून देण्यात येतील .प्रत्येक विद्यार्थ्यांने आपले ध्येय निश्चित केले पाहिजे . ध्येयपुर्ती साठी महाविद्यालय कटिबद्ध आहे. स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांनी शुभेच्छा दिल्या . स्पर्धापरीक्षांबरोब सीए, सीएस, पोलिस भरतीसाठी ही महाविद्यालयामध्ये मार्गदर्शन सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. सर्व संबंधीत विद्यार्थ्यांनी या सुविधांचा लाभ घेणे आवश्यक आहे. भोसरी विधानसभेचे प्रथम आमदार आणि राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेचे अध्यक्ष आदरणीय विलास लांडे यांनी कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. किरण चौधरी , कला शाखाप्रमुख डॉ. श्रेया दाणी, विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. अनिल गंभीरे, रासेयो अधिकारी डॉ. सुग्रीव आडाल, इंग्रजी विभागप्रमुख प्रा. कमलेश जगताप, व्यवस्थापन विभागप्रमुख प्रा. सारिका जगताप, वाणिज्य विभागप्रमुख प्रा. जयश्री आरमनी, बीसीए (सी.एस) विभागप्रमुख प्रा. रूपाली माने, आदी प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्थशास्त्र विभाग प्रमुख व कार्यक्रम समन्वयक डॉ. दीपक पावडे यांनी केले तर उपस्थितांचे आभार शारीरिक शिक्षण संचालक डॉ. गणेश चव्हाण यांनी मानले .

# माटे हायस्कूलमध्ये शालेय विद्यार्थी वाहतूक,परिवहन समितीची स्थापना

## शिक्षण विश्व: विद्यार्थी सुरक्षिततेला प्राधान्य देऊन समितीची स्थापना

। पिंपरी चिंचवड ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**व्ही.के. माटे हायस्कूल चिंचवड मध्ये शालेय विद्यार्थी वाहतूक समितीची स्थापना करण्यात आली. सभेच्या अध्यक्षस्थानी मोरया शिक्षण संस्थेच्या कार्यवाह, तहयात विश्वस्त,प्राचार्या इंद्रायणी माटे पिसोळकर होत्या.**



प्राचार्या इंद्रायणी माटे पिसोळकर म्हणाल्या 2025 -26 या शैक्षणिक वर्षापासून मोरया शिक्षण संस्थेच्या सर्व संलग्न शाळांमधील विद्यार्थ्यांची वाहतूक ही मोरया शिक्षण संस्थेने अधिकृतरित्या करार केलेल्या. श्री स्वामी समर्थ एंटरप्राइजेस यांच्यामार्फत पुरवल्या जाणाऱ्या स्कूल बस मधूनच करण्याचा यावेळी निर्णय घेण्यात आला. विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेता शासनाने घालून दिलेल्या नियमानुसार विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी आवश्यक त्या सर्व सुविधा त्या बसमध्ये उपलब्ध करून देण्यात येणार असल्यामुळे येथून पुढे श्री स्वामी समर्थ एंटरप्राईजेस यांच्या स्कूल बस मधूनच विद्यार्थ्यांनी शाळेमध्ये येण्याचे पालकांना व विद्यार्थ्यांना आवाहन करण्यात आले. श्री स्वामी समर्थ इंटरप्राईजेस यांच्या स्कूलबस मध्ये विद्यार्थी व पालकांसाठी सुरक्षितता देण्यासाठी जीपीएस यंत्रणा, टॅपिंग प्रेझेंटी, लाईव्ह लोकेशन अधिकृत वाहन चालक व मावशी व वेळेवर विद्यार्थ्यांना शाळेत आणण्याचे व घरी सोडण्याचे नियोजन , प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतंत्र बसण्याची जागा या सर्व सुविधा देण्यात येणार असल्याचे अध्यक्ष श्री स्वप्निल शेडगे यांनी सांगितले. श्री स्वामी समर्थ इंटरप्राईजेस चे संचालक श्री. नवले यांनी श्री स्वामी समर्थ इंटरपाईजेस यांच्यामार्फत या सर्व सुविधा देण्याचे आश्वासन दिले .मोरया शिक्षण संस्थेने नाकारलेल्या ,परवानगी न दिलेल्या किंवा संस्थेशी करार नसणाऱ्या स्कूल बस आणि व्हॅन मधून विद्यार्थ्यांना पालकांनी पाठवू नये असे आवाहन मोरया शिक्षण संस्थेचे , परिवहन समितीचे अध्यक्ष श्री स्वप्निल शेडगे यांनी सांगितले.

परिवहन समितीची कार्यकारिणी पुढीलप्रमाणे गठित करण्यात आली. अध्यक्ष स्वप्निल शेडगे उपाध्यक्ष इंद्रायणी माटे- पिसोळकर ,लोकप्रतिनिधी शितल शिंदे, सचिव हनुमंत हुचगोळ ,समिती सदस्य रणजीत सावंत, दिलीप साळुंके, विलास पाटील, चित्रा आपटे, पूजा पिसाळ, छाया कुलकर्णी वाहतूक कंत्राटदार महेश नवले ,वाहतूक विभाग चिंचवड शंकर ढामसे मोरया शिक्षण संस्थेच्या सर्व शाळांची एकत्रित परिवहन समिती गठीत करण्यात आली. सूत्रसंचालन हनुमंत हुचगोळ यांनी केले तर आभार विलास पाटील यांनी मानले.

# पीसीयू आणि यूजीसी करारामुळे बहुविषयक शिक्षणाला चालना

## डॉ. राजेश कुमार दुबे: पीसीयू आणि यूयूजीसी, एचआरडीसीचे यांच्या मध्ये सामंजस्य करार

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**उच्च दूरदृष्टी, स्पष्ट ध्येय आणि वेगाने प्रभावी अंमलबजावणी या त्रिसूत्रीमुळे पिंपरी चिंचवड विद्यापीठ वेगाने प्रगती करीत आहे.पीसीयू आणि यूजीसी करारामुळे फॅकल्टी डेव्हलपमेंट आणि बहुविषयक शिक्षणाला निश्चित चालना मिळेल असा विश्वास विद्यापीठ अनुदान आयोगाचे - एचआरडीसी संचालक डॉ. राजेश कुमार दुबे यांनी व्यक्त केला.**






तसेच विकासाचा टप्पा साध्य करण्यासाठी इतर विद्यापीठांना वीस वर्षे लागली तो टप्पा पीसीयू विद्यापीठाने अवघ्या दोन वर्षात गाठला आहे असे गौरवोद्गार डॉ. दुबे यांनी काढले.

पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयू) आणि (यूजीसी) मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्र (एमएमटीसी), मानवी संसाधन विकास केंद्र (एचआरडीसी) यांच्या मध्ये सोमवारी (दि. ४) सामंजस्य करार करण्यात आला. या करारावर पीसीईटीचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई आणि यूजीसी - एचआरडीसी संचालक प्रा. डॉ. राजेश कुमार दुबे यांनी सह्या केल्या. या करारामुळे शैक्षणिक उत्कृष्टतेस प्रोत्साहन मिळेल, फॅकल्टी डेव्हलपमेंट वेगाने होईल आणि बहुविषयक शैक्षणिक सहकार्य घडून विद्यार्थ्यांना नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार उच्च दर्जाचे शिक्षण मिळेल. यावेळी पीसीयूचे कुलगुरू डॉ. गोविंद कुलकर्णी, प्र - कुलगुरु डॉ. सुदीप थेपडे आदी उपस्थित होते.

डॉ. दुबे म्हणाले की, आजचे शिक्षक केवळ अध्यापन करणारे नसून राष्ट्रनिर्माते आणि समस्यांचे उपाय शोधणारे चिकित्सक संशोधक असले पाहिजेत. त्यांचामध्ये विशाल दृष्टीकोन आणि स्थानिक समस्यांवर उपाय शोधणारे गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याची क्षमता असली पाहिजे. तसेच त्यांना नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार (एनईपी) संयुक्त पदवी व दुहेरी पदवी अभ्यासक्रम हे समजून घेऊन त्यासाठी काम करता आले पाहिजे. यासाठी पीसीयू आणि युजीसी यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला आहे.

आता यूजीसी - एचआरडीसी प्रायोजित राष्ट्रीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम्स पीसीयूमध्ये आयोजित केले जातील. या उपक्रमांद्वारे विविध शाखांतील प्राध्यापक एकत्र येऊन संवाद, सहअभ्यास, आणि नवीन अध्यापन पद्धतींवर चर्चा करतील. यामध्ये आंतरशाखीय अभ्यास व प्रशिक्षणाच्या नव्या दृष्टीकोनांवर विचारमंथन घडेल असे डॉ. दुबे यांनी सांगितले.

डॉ. गिरीश देसाई म्हणाले की, शैक्षणिक गुणवत्ता, सर्व समावेशकता आणि सहकार्य ही आमच्या पीसीईटी आणि पीसीयूची मूल्ये आहेत. हा करार महत्त्वपूर्ण पाऊल आहे. यामुळे नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण अधिक प्रभावीपणे राबविता येईल.

पीसीयू चे कुलगुरू डॉ. गोविंद कुलकर्णी यांनी राष्ट्रीय शिक्षण धोरणात अधोरेखित करण्यात आलेली नवोपक्रमशीलता, विद्यार्थ्यांमधील उद्योजकता आणि विकसित भारत व 'मेक इन इंडिया' सारख्या उपक्रमांचे उद्दिष्ट या विद्यापीठाच्या धोरणात अंतर्भूत आहे असे सांगितले.


पीसीयूचे प्र-कुलगुरू डॉ. सुदीप थेपडे यांनी पीसीयूच्या भविष्यातील योजना, संशोधन प्रकल्प आणि अभ्यासक्रम नवकल्पना याविषयी माहिती दिली. पीसीयूचे कुलपती तथा पीसीईटीचे विश्वस्त हर्षवर्धन पाटील, पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनामुळे पीसीयू गुणवत्ता आणि सर्वांगीण विकासाच्या दिशेने पुढे जात आहे.

# "डीपी प्लॅन" विरोधात राष्ट्रवादी काँग्रेसचा महामोर्चा

## मोर्चाचे गुरुवारी आयोजन; नागरिकांनाही सहभागी होण्याचे आवाहन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी । महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिकेने नुकताच शहरासाठी सुधारित प्रारुप विकास आराखडा सादर केला आहे. या आराखड्या विरोधात तब्बल पन्नास हजार हरकती नागरिकांनी घेतल्या आहेत. या आराखड्यातील गंभीर त्रुटी, अनियमतता आणि जनविरोधी धोरणांविरोधात आवाज उठविण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने महापालिकेवर महामोर्चा काढण्यात येणार आहे.**




राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष योगेश बहल यांनी याबाबतची माहिती पत्रकार परिषदेत दिली. पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

याबाबत योगेश बहल म्हणाले पिंपरी चिंचवड शहराच्या भविष्याला दिशा देणारा प्रारूप सुधारित विकास आराखडा २०२५ हा केवळ कागदावरचा देखावा असून तो शहरातील जनतेच्या भावना, कायदेशीर बाबी आणि विकासाच्या वास्तवाशी पूर्णपणे विसंगत आहे. तब्बल ५० हजारनागरिकांनी हरकती घेतल्या ही त्याची पावती आहे. भूमिपुत्र, शेतकरी, छोटे कारखानदार, गोरगरिब सामान्य नागरिकांच्या अपेक्षा आणि गरजा पूर्ण करण्यास हा आराखडा सपशेल अपयशी ठरल्याचा हा पुरावा आहे.

महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यामागील ऐतिहासिक 'भीमसृष्टी मैदान'वर पोलीस स्टेशन, मनपा उपयोग आणि बस टर्मिनसचे आरक्षण प्रस्तावित करणे निषेधार्ह आहे. तसेच चिंचवड गावातील ऐतिहासिक चापेकर स्मारकासाठी असलेल्या आरक्षणावर इतर आरक्षणे टाकले आहे. याबरोबरच रेड झोन हद्दीचा संभ्रम, इतरही आरक्षणात बाबतीत घोळ घालण्यात आलेला आहे या सर्वांच्या विरोधात महामोर्चाचे आयोजन करण्यात आले असून नागरिकांनी देखील यामध्ये सहभागी व्हावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने करण्यात आले आहे.